महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## सर्वोत्कृष्ट अधिकारी पुरस्कार-२०२३ डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना प्रदान

## महामेट्रोला सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा पुरस्कार.

## 14वा CIDC विश्वकर्मा पुरस्कार-2023.



नागपूर : नवी दिल्ली येथे झालेल्या 14 व्या बांधकाम उद्योग विकास परिषदेत (CIDC) विकास आणि बांधकामाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना CIDC च्या वतीने सर्वोत्कृष्ट अधिकारी विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला. CIDC तर्फे आयोजित 3 दिवसीय कार्यक्रम नवी दिल्ली येथे परिषदेच्या शेवटच्या दिवशी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सीआयडीसीचे अध्यक्ष श्री पी एस राणा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. CIDC परिषद नीती आयोगच्या अंतर्गत कार्य करते.

तीन दिवसीय परिषदेत देशातील विविध संस्थांनी सहभाग घेतला. महामेट्रोने केलेले बांधकाम, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि कार्यक्षम व्यवस्थापन यासाठी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.ब्रिजेश दीक्षित यांची 14 व्या CIDC परिषदेतर्फे ''विश्वकर्मा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार 2023'' साठी निवड करण्यात आली. रोलिंग स्टॉक , सिस्टीम आणि ऑपरेशन) श्री.सुनील माथूर यांना उत्कृष्ट कामासाठी पुरस्कार देण्यात आला. 5D बीम पद्धतीचा अवलंब करून उत्कृष्ट काम केल्याबद्दल महा मेट्रोला सर्वोत्कृष्ट बांधकाम पुरस्कार घोषित करण्यात आला. डॉ. दीक्षित यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखाली महामेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यामुळे मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाले, आणि त्याचवेळी दुसऱ्या टप्प्याचे काम 11 डिसेंबर 2022 रोजी करण्यात आले. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत डॉ. ब्रिजेश दीक्षित यांच्या नेतृत्वाखाली नागपूर शहरात अनेक आवश्यक व अभिनव संकल्पना राबवत, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक वाहतूक प्रणालीचे जाळे तयार करण्यासाठी बांधकाम करण्यात आले आहेत. वर्धा रोड डबल डेकर आणि कामठी रोडवरील चार स्तरीय वाहतूक प्रणाली, विविध संकल्पनांची मेट्रो स्थानके तसेच इतरही कार्ये करण्यात आले. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले आहे.

अतुलनीय बांधकाम कार्य. डॉ. दीक्षित यांची कार्यशैली, कार्यक्षम नेतृत्व आणि अचूक व्यवस्थापनच्या माध्यमातून केवळ शहराचाच चेहेरा मोहरा बदलला नाही तर, राज्यभर त्यांच्या नेतृत्वात अनेक कार्य नियोजित केले गेले आहेत. ह्याच कारणांमुळे नागपूर मेट्रोची देश-विदेशात चर्चा आहे. महामेट्रोला परिषदेचा सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा पुरस्कार 2023 जाहीर झाला आहे. महामेट्रोकडून बांधकामासाठी 5डी बीम पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. नागपूर आणि पुण्यात या पद्धतीचा अवलंब केल्याने प्रकल्प खर्च, वेळेची बचत होत आहे. त्याचबरोबर नागपूर मेट्रो हि एकमेव ग्रीनेस्ट मेट्रो ठरली आहे ज्यासाठी प्रत्येक मेट्रो स्थानकाला आयजीबीसीचे सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे. अजूनही जागतिक दर्जाची कामे केली जात आहेत. महामेट्रोने केलेल्या अतुलनीय बांधकामासाठी उत्कृष्ट पायाभूत सुविधा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक यावेळी काही कामामुळे अनुपस्थित असल्याने, हा अवॉर्ड मुक्या प्रकल्प व्यवस्थापक विद्यासागर ह्यांना सोपण्यात आला.